**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:03.04.2025** **वार:गुरूवार**

---

**ठळक बातम्या**

1. लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयक मंजूर; वक्फ मंडळांना सर्वसमावेशक बनविण्याचा उद्देश असल्याचं सरकारचं प्रतिपादन; तर हे विधेयक दिशाभूल करणारं असल्याची विरोधकांची टिका.

2. ॲग्रीस्टॅक प्रकल्पाअंतर्गत राज्यातील 85 लाख शेतकऱ्यांची नोंदणी.

3. देशभरात पथकरामध्ये 4 ते 5 टक्के वाढ

4. नंदूरबारमध्ये विना हॉलमार्क सोने विक्रीवर भारतीय मानक ब्यूरोची कारवाई

आणि

5. राज्यात आजही वारे, वीजा, गारांसह पावसाचा इशारा

**वक्फ विधेयक**

लोकसभेनं वक्फ (सुधारणा) विधेयक 2025 मंजूर केलं आहे. 288 सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं तर 232 सदस्यांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केलं.

यापूर्वी, संयुक्त संसदीय समितीनं अहवाल दिल्यानुसार लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयकावर चर्चा झाली. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं की, या विधेयकाचा मुस्लिमांच्या धार्मिक प्रथांशी काहीही संबंध नाही आणि ते केवळ वक्फ मंडळांच्या मालमत्तांशी संबंधित आहे. सरकारचा वक्फ मंडळांना सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्ष बनविण्याचा उद्देश आहे असं सांगून रिजीजू म्हणाले की हा कायदा मशिदींच्या व्यवस्थापनासाठी नाही आणि कोणाचीही मालमत्ता जप्त करण्याचा त्यात हेतू नाही.

**गवर्मेंट किसी भी धार्मिक व्यवस्था को, किसी भी रिलीजियस इंस्टीट्यूशन कोई धार्मिक काम में हस्तक्षेप करने नहीं जा रही है, ना ही वक्फ बोर्ड किसी धार्मिक स्थापित व्यवस्था में कोई भी तरीके से हाथ डालने का प्रावधान है। बिलकुल नहीं है, ये वक्फ बोर्ड का जो प्रावधान किसी मस्जिद, किसी मंदिर, किसी धार्मिक स्थल का व्यवस्था का कोई लेना-देना नहीं है। ये सिंपली एक प्रॉपटी का मैनेजमेंट का विषय है।**

किरेन रिजीजू म्हणाले की, या विधेयकानुसार, वक्फ मंडळांमध्ये विविध मुस्लिम पंथांचे आणि महिलांचे प्रतिनिधी असतील. विरोधक या विधेयकाबाबत लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप  त्यांनी केला. आधीच्या कायद्यात, देशातील कोणत्याही जमिनीला वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यासाठी काही तरतुदींचा गैरवापर करण्यात आला असल्याचं त्यांनी नमूद केलं.

विरोधकांना उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या संयुक्त संसदीय समितीनं सविस्तर चर्चा केल्यानंतर हे विधेयक आणलं आहे.

चर्चेला सुरुवात करताना, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी हे सरकार लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हे विधेयक संविधानाविरुद्ध आहे. या कायद्यातील सुधारणांमुळे अधिक समस्या निर्माण होतील अशी टिका त्यांनी केली.

समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी महागाई, बेरोजगारी, आणि इतर मुद्द्यांशी संबंधित अपयश लपविण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे अशी टिका केली.

तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी प्रस्तावित कायदा चुकीचा, तर्कहीन आणि मनमानी असल्याचं म्हटलं. मुस्लिम समुदायाच्या अधिकारांवर अंकुश लावण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,  भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील धर्मनिरपेक्षता हे तत्त्व, या सुधारणा विधेयकातून प्रतिबिंबित होत असून, अतिशय प्रागतिक आणि पुरोगामी पाऊल या निमित्तानं टाकण्यात आलं आहे. वक्फ सुधारणा विधेयकातून अनेक चुकीच्या बाबींना पायबंद बसणार आहे. सद्सद्विवेकबुद्धी जिवंत आहे अशी प्रत्येक व्यक्ती या सुधारणा विधेयकाला पाठिंबा दर्शवेल असा  विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**आराखडा**

राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत एका आढावा बैठकीत सांगितलं. या आराखड्यात 938 कृतीबिंदूंवर काम करण्याचं निश्चित करण्यात आलं होतं. त्यानुसार 411 कामं पूर्ण झाली असून 372 कामं अंतिम टप्प्यात आहेत. 16 टक्के मुद्दयांवर विभागांना 15 दिवसांचा अवधी वाढवून देण्यात आला असून 1 मे पर्यंत ही सर्व कामं पूर्ण होतील असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. 26 विभागांचा आढावा काल घेण्यात आला, आज 22 विभागांचा आढावा घेतला जाणार आहे.

**शेतकरी ओळखपत्र**

केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीनं राबविण्यात येत असलेल्या ॲग्रीस्टॅक या प्रकल्पाच्या अंतर्गत शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासाठी राज्यातील 1 कोटी 40 लाख शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत अंदाजे 85 लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांची पूर्ण माहिती, त्यांची शेतजमीन, पीक पद्धती, आर्थिक विवरण, यांसह शेतकऱ्यांना आवश्यक असणारी माहिती जमा करण्यात येत आहे.

**पथकर शुल्क वाढ**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं, देशभरातल्या पथकरामध्ये, 4 ते 5 टक्क्यांनी वाढ केली असून, ती तत्काळ लागू झाली आहे. हलक्या वाहनांसाठी 5 ते 10 रुपये तर जड वाहनांसाठी, 20 ते 25 रुपयांनी पथकर वाढणार आहे. कारसाठीचा मासिक पास आता 930 वरून 950 रुपये होणार असून, हे सुधारित दर, देशभरातले राष्ट्रीय महामार्ग तसंच द्रुतगती मार्गांना लागू होणार आहेत.

**अजित पवार**

पक्षांमध्ये येणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या मोठी आहे मात्र कार्यकर्त्यांची निवड करताना त्यांचा पूर्व-इतिहास देखील तपासणं गरजेचं आहे. आपल्या अवतीभवती चुकीच्या प्रवृत्तीचे लोक असता कामा नये याची खबरदारी सर्वांनी घ्यावी अशा परखड सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आजी - माजी आमदार, जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख नेत्यांना केल्या आहेत. पक्ष बांधणी आणि संघटनेसाठी बीडमध्ये काल आयोजित युवा संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

**नंदुरबार छापे**

भारतीय मानक ब्यूरोच्या पथकानं काल नंदुरबारमधल्या सराफा दुकानांवर छापे घातले. शहरातील तीन सराफा दुकांनामध्ये विना हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांची विक्री होत असल्याच्या तक्रारी भारतीय मानक ब्यूरोला मिळाल्या होत्या. त्या संदर्भात ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत साधारण 900 ग्रॅम सोनं जप्त करण्यात आलं.

**परवाने निलंबित**

भंडारा जिल्ह्यात वाहतूक पोलिसांनी गेल्या तीन वर्षात गाडी चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या 81 हजार 122 वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली. अंदाजे चोविसशे जणांचे परवाने तात्पुरते निलंबित करण्यात आले.

**चंद्रपूरच्या विद्यार्थ्यांचे यश**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या पीएम श्री सावित्रीबाई फुले शाळेतील राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या 20 विद्यार्थ्यांपैकी 17 विद्यार्थी केंद्राच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. एकाच शाळेतील सर्वात अधिक संख्येनं या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा मान या शाळेनं मिळविला आहे. ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बल घटकातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी देशपातळीवर ही शिष्यवृत्ती परीक्षा केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत घेण्यात येते. त्यांचं बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण व्हावं हा या योजनेचा गाभा आहे.

**बुलडाणा अपघात**

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव शहरालगत असलेल्या शेगाव रस्त्यावर काल पहाटे दोन बस आणि एक गाडी एकमेकांना धडकून झालेल्या अपघातात 6 जण ठार तर 26 प्रवासी जखमी झाले. जखमींवर खामगाव रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**वैद्यकीय परिषद निवडणूक**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणुकीसाठी आज सकाळी 8 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत मतदान होणार आहे. नोंदणीकृत MBBS डॉक्टर हे मतदार आहेत. नऊ जागांसाठी 41 उमेदवार असून प्रत्येक मतदार 9 मतं देणार आहे.

**सामंजस्य करार**

विद्यार्थ्यांना कौशल्यविषयक प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्यादरम्यान काल एक सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळं गोंडवाना विद्यापीठात अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येईल आणि उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सोसायटीमार्फत प्रयत्न केले जातील.

**चंद्रपूर पुरस्कार**

चंद्रपूर शहर महानगरपालिकेला सलग दुसऱ्या वर्षीचा राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. काही दिवसांपूर्वीच मालमत्ता कराची नॅच प्रणाली यशस्वीरित्या राबविल्याबद्दल 2023-24 वर्षाकरीता महानगरपालिका गटातील तिसरा पुरस्कार चंद्रपूर महानगरपालिकेला मिळाला होता.

**रोजगारनिर्मिती कार्यक्रम**

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम या योजनेचं रत्नागिरी जिल्ह्याचं उद्दिष्ट 100 टक्के पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अजिंक्य आजगेकर यांनी दिली. प्राप्त अर्जापैकी 2210 नवउद्योजकांचे अर्ज पात्र ठरले असून 817 नवउद्योजकांना वित्तपुरवठा करण्यात आला आहे. लाभार्थ्यांना अनुदान मिळवून देण्यातही जिल्हा राज्यात अग्रेसर असल्याचं आजगेकर यांनी सांगितलं.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये गुजरात टायटन्सनं काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा 8 गडी राखून पराभव केला. गुजरातनं 170 धावांचं लक्ष्य अठराव्या षटकातच सहज पार केलं. तत्पूर्वी आरसीबीनं 8 गडी बाद 169 धावा केल्या.

**पाऊस**

नाशिक जिल्ह्यातील अनेक गावात काल दुपारी गारपीट, वादळी वाऱ्यासह पावसानं जोरदार हजेरी लावली. वादळी वारे आणि पावसामुळं काढणीस आलेल्या आणि शेतात काढून ठेवलेल्या कांद्यासह अन्य पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

रत्नागिरीत आज पहाटे अनेक ठिकाणी वीजांसह सुमारे तासभराहून अधिक काळ जोराचा पाऊस पडला. या पावसामुळं उकाड्यातून दिलासा मिळाला असला, तरी आंबा-काजूसारख्या पिकांसाठी तो नुकसानकारक ठरणार आहे. गेले दोन-तीन दिवस ढगाळ वातावरण होतं; मात्र पाऊस पडला नव्हता.

धुळे जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसानं जोरदार तडाखा दिला आहे. नेर गावासह परिसरात गारपीटीसह पावसानं झोडपून काढल्यानं पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा कोकण आणि विदर्भात आज वीजा, गारपीट आणि जोराच्या वाऱ्यांसह तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम किंवा विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**